बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र
'अर्जुन' बिल्डिंग, कोरेगांव रोड, पुणे ४११००१
दुरध्वनी ०२०-२६१२२०३९...E-mail-mhbalgram@gmail.com
Web site--balgrammaharashtra.org.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

: वै शि ष्टे :

१] संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी क्रमांक-एमएएच/१४४, पुणे.

२] मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी क्रमांक - एफ /७५९/पुणे.

३] संस्था राजकारणापासुन पुर्णपणे अलिप्त. तसेच कोणतेही धर्म,पंथ किंवा तत्सम संघटना यांना संस्था बांधील नाही.

४] आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० जी नुसार आयकर ॲक्ट परिपत्रक क्रमांक-७/ २०१० (प्र.क्र.१९७/२१/२०१०-आयटीए-I) दि. २७-१०-२०१० अन्वये कायमस्वरूपी सवलत/सुट.

***********

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र
'अर्जुन' बिल्डिंग, कोरेगांव रोड, पुणे ४११००१

**संस्थापक/अध्यक्ष**
कै. श्री दौलतराव जिवराव उर्फ बाबासाहेब जाधव

**अध्यक्षः** श्री रजनीकांत नेन्सी
**उपाध्यक्षः** श्री सुनिल देशमुख
**मानद सचिव** : श्रीमती रंजन पुराणिक
**मानद खजिनदारः** श्री रूपचंद कांडगे

**क्षेत्रीय अध्यक्ष**

मुंबईः श्री शामकांत पाटील
नागपुरः सौ. सुमन कांडगे
पुणेः सौ. मिनल टिपणीस
औरंगाबादः श्री सुनिल देशमुख

**विश्वस्त**

श्री रजनीकांत नेन्सी
श्री सुनिल देशमुख
श्री रूपचंद कांडगे
सौ. मिनल टिपणीस
श्री शामकांत पाटील
श्रीमती रंजन पुराणिक
श्रीमती शेवंता चव्हाण

**संचालक मंडळ**

श्री रजनीकांत नेन्सी
श्रीमती शेवंता चव्हाण
श्री रूपचंद कांडगे
सौ. दिपा राहतेकर
श्रीमती नलिनी ठुसे
सौ. सुमन शिरवळकर
श्री प्रतापराव पवार

**संचालक मंडळ**

श्रीमती रंजन पुराणिक
श्री सुनिल देशमुख
सौ. मिनल टिपणीस
सौ. सुमित्रा बेनाडीकर
सौ. मिनल जोशी
श्री विरेंद्र गुजर

**संचालक मंडळ**

श्रीमती आशा शेठ
श्री शामकांत पाटील
सौ. सुमन कांडगे
श्री नंदकुमार वाळंज
श्री कोमल शहा
श्रीमती लिलावती जाधव
सौ. शोभना जाधव

श्री अशोक घाडगे, कार्यकारी संचालक

**प्रशासन प्रतिनिधी** : मा. उपायुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे ४११००१

**: सनदी लेखापल :**

मेसर्स शशी त्रीवेदी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्,पुणे ४११०३७
आणि.
मेसर्स आर.एस. मोहिते आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् कोल्हापुर ४१६२०१

BALGRAM MAHARASHTRA PUNE

## : ऋ ण नि र्दे श :

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्, पुणे संघटनेस खालील नमुद केलेल्या शासकीय, स्वयंसेवी संस्था,संघटना,व्यक्ति यांनी केलेल्या मदतीबाबत संस्था यांची ऋणी आहे.

१) मा. आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट् राज्य,पुणे यांनी बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज,पुणे आणि बालग्राम महाराष्ट्राशी संलग्न व अधिनस्त असलेल्या संस्थांना दरडोई अनुदान रूपये २०००/-दरमहा मंजुर केले याबाबत बालग्राम महाराष्ट् आभारी आहे.

२) मा.आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट् राज्य,पुणे मा.आयुक्त व त्यांचे अधिकारी तसेच मा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,पुणे मा. अध्यक्ष व सदस्य बाल कल्याण समिती यांनी बालग्राम महाराष्ट्र व संलग्न संस्थांना बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले, याबाबत बालग्राम महाराष्ट् आभारी आहे.

३) अनेक व्यक्तिंनी रोख व वस्तुरूपाने देणग्या दिल्या तसेच संस्थांना भेटी देउन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बहुमोल मदत केली, त्याबद्दल बालग्राम महाराष्ट् आभारी आहे व आपली सदैस ऋणी राहिल.

**********************

BALGRAM MAHARASHTRA PUNE

**: श्र द्धां ज ली :**

बालग्राम महाराष्ट्राच्या मॅनेंजिग ट्रस्टी तथा माजी विश्वस्त कै. लिलाताई दौलतराव जाधव यांचे वृध्दापकाळाने दिनांक २३-०२-२०१९ रोजी दुःखद निधन झाले.

मृतात्म्यास शांती लाभावी हिच बालग्राम महाराष्ट्रा तर्फे भावपूर्ण श्रध्दांजली

*********

: वार्षिक अहवाल :
: २०१८–२०१९ :

BALGRAM MAHARASHTRA PUNE

**बालग्राम चळवळः**

दुस–या महायुध्दामध्ये हजारो मुले अनाथ,बेघर व भावनिक रूग्ण झालेली होती.. पारंपारिक बाल संगोपन संकल्पनेला आवाहन देउन डॉ. हरमन मायनर यांनी ऑस्ट्रियामध्ये इम्स्ट (IMPTS) येथे १९४९ मध्ये जागातील पहिले बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस या संस्था स्थपनेव्दारे सुरू केले. बाल संगोपनाची गुरूकिल्ली शोधुन काढली. ती म्हणजे 'बालग्राम' होय. बालग्राम मध्ये विविध वयोगटातील मुल–मुली भाउ – बहिण म्हणुन कौटुंबिक जिव्हाळयात सदन माता/गृहमातेच्या निगराणीत सर्वांगिण विकास करून घेतात. मुलांना हवा असणारा भावनिक आधार ,प्रेम मिळाल्यामुळे मुलांची वाढ सोपस्कर होते. एका सदनिकेत ८ ते १० मुल–मुली एकत्र नैसर्गिक कुटुंबाप्रमाणे राहतात.अशा ५ ते २० सदनिका/घर म्हणजे 'बालग्राम' होय.

एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस ही बाल संगोपनाची सर्वांगिण आंतरराष्ट्रीय संकल्पना जगमान्य झाल्याने १३३ देशांमध्ये 'बालग्राम' व्दारे करोडो मुलांचा विकास साधला जात आहे. भारतामध्ये एस.ओ.एस. चळवळीची सुरवात १९६४ साली झाली. एस.ओ.एस. चे जनक डॉ. हरमन मायनर हे १९६३ मध्ये भारत भेटीस आले असताना तात्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांना 'बालग्राम एस.ओ.एस. संकल्पना' ही खुप आवडली आणि भारतातील पहिल बालग्राम दिल्ली ग्रीनफिल्ड येथे सुरू झाले. एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस ऑफ इंडिया ही बालसंगोपनातील अग्रेसर संस्था मानली जाते.हळुहळु त्याचा विस्तार होउन विविध राज्यांमध्ये बालग्रामे सुरू झाली.

महाराष्ट्रामध्ये बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र (बालग्राम महाराष्ट्र) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना १९७४ साली झाली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री दौलतराव जाधव (बाबासाहेब) हे महिला व बाल विकास या शासनाच्या विभागाचे प्रमुख पदाधिकारी आसतांना त्यांनी दिल्ली येथील बालग्राम पाहिले व डॉ. हरमन मायनर यांचे प्रेरणेतुन महाराष्ट्रामध्ये 'बालग्राम महाराष्ट्राची' स्थापना केली. महाराष्ट्रातील पहिल बालग्राम गागोदे (जिल्हा रायगड्) विनोबाजी भावे यांच्या निवासस्थानी श्रीमती शोभना रानडे (कस्तुरबा ट्रस्ट सचिव) इतरांचे सहकार्याने सुरू करण्यात आले होते.

आज बालग्राम महाराष्ट्र अधिनस्त व संलग्न (NGO) संस्था मिळुन १२ बालग्रामे चालु आहेत. बाल न्याय अधिनियम बदलामुळे मुल-मुली वेगवेगळी ठेवण्याच्या कायदेशीर बंधनामुळे 'बालग्राम' ही कुटुंब व्यवस्था बाल संगोपन ही संकल्पना कायमस्वरूपी मोडीत निघाली आहे ही खेदजनक बाब आहे. बालन्याय अधिनियमानुसार प्रत्येक संस्था स्वतंत्र नोंदणी केल्याने त्या संस्थेचे अतिस्तत्वही स्वतंत्र झाले आहे. त्यामुळे बालग्राम महाराष्ट्र व संलग्न संस्थातील नाते अत्यंत जुजबी झाले आहे. बहुतांशी संस्थांची संलग्नताही रद्द करण्यात आलेली आहे. काही मोजक्या संस्थाच संलग्नतेच्या यादीत आहेत.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र/बालग्राम महाराष्ट्र हया ट्रस्टची सोसायटी रजिस्ट्रशन ॲक्ट अधिनियम १८६० नुसार नोंदणी क्रमांक-MAFH/F944 पुणे आणि मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार क्रमांक-F/759 पुणे नुसार नोंदणी करण्यात आली. बालग्राम महाराष्ट्र या संस्थे मार्फत १९७७ साली पन्हाळा येथे बालग्राम आणि १९७९ साली येरवडा,पुणे येथे बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस सुरू केले.

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस् महाराष्ट्र/बालग्राम महाराष्ट्र या संस्थेतर्फे खालील बालग्रामे/उपक्रम चालविले जातात.

१) पंचदीप संकुल,नविन पनवेल, जिल्हा रायगड
२) बालग्राम महाराष्ट्र संचलित निला बालसदन,अंबरनाथ, जिल्हा ठाणे.
३) बालग्राम महाराष्ट्र संचलित डॉ. हरमन मायनर सोशल सेंटरचे श्री पांडुरंग मंत्री केंद्र, पुणे
४) श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्राम पन्हाळा,जिल्हा कोल्हापुर,
५) बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज, येरवडा,पुणे (सध्या एस.ओ.एस. इंडिया, नवि दिल्ली नोव्हेंबर २०१४ पासुन पाच वर्षा करिता प्रशासक म्हणुन कार्यरत)

वरील सर्व संस्था बालग्राम महाराष्ट्र अधिनस्त आहेत.

**बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र मध्यवर्ती कार्यालयः**

अहवाल सालामध्ये श्री अशोक घाडगे कार्यकारी संचालक म्हणुन कार्यरत आहेत. सौ. वंदना जाधव,लेखापाल, श्री श्रीकांत इनामदार, लिपिक-टंकलेखक, सौ. माधुरी कवडे,सहायक यांनी मध्यवर्ती कार्यालयात काम केले. हे कार्यालय 'अर्जुन' बिल्डिंग, चौथा मजला,कोरेगांव रोड,पुणे ४११००१ येथे आहे. श्री एस.बी. इनामदार, लिपिक-टंकलेखक हे माहे ३१ मे २०१९ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत.

मध्यवर्ती कार्यालयाकडुन खालील अत्यंत महत्वाचे कामाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

१) बालग्राम येरवडा च्या जागेबाबत लॅण्ड लिज वाढवुन मिळणेबाबत मा. तहसीलदार व मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठपुरावा चालु आहे. लॅण्ड लिज प्रकरण महसुल विभाग महाराष्ट्र शासन दप्तरी वार्षिक भाडे दरमहा ठरविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालयाने पाठविला आहे. जिल्हाधिकारी यांनी महिला व बाल आयुक्तालयाला बालग्रामची मान्यता रद्द करणेबाबतचा अहवाल मागितला होता त्याचा तपशील बालग्राम महाराष्ट्र विश्वस्त मंडळाची बैठक मा. आयुक्त महिला व बाल विकास यांचे सोबत झाली व त्यांचे सुचनेनुसार येरवडा बालग्राम अनुशंगाने विश्वस्तांचे वतीने 'हमीपत्र' सादर करण्यात आले आहे.
२) बालग्राम महाराष्ट्राचे विश्वस्त बदल (Change Report) चा पाठपुरावा मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय,पुणे यांचेकडे चालु आहे. सन २०१६-२०१९ पाठपुरावा चालु आहे.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

३) बालग्राम महाराष्ट्र पुणे व कस्तुरबा ट्रस्ट सासवड यांचे संयुक्ताने बाल आनंद मेळा/मामाच्या गावाची सहल-बाल दिन स्तुत्य उपक्रम माहे नोव्हेंबर १२,१३ आणि १४ (हिवाळी सहल) म्हणुन साजरा करण्यात आला. अधिनस्त व संलग्न संस्थातील अंदाजे १५० विद्यार्थ्यांना सहभाग घेउन-आनंदोत्सवात आनंद लुटला.

४) सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) पुणे यांचेकडुन इमारत भाडे निश्चित करून अर्जुन बिल्डिंग कार्यालयातील भाडे करारावर दिलेल्या इमारतीचे सुधारित भाडे निश्चित करण्यात आली.

५) कार्यकारी संचालक यांस कामगार न्यायालयाच्या केस मध्ये पाठपुराव्यासाठी वेळ द्यावा लागतो. येरवडा बालग्रामच्या २३ कर्मचा-यांना सेवामुक्त केल्यापैकी नउ कर्मचारी न्यायालयात संस्थे विरूध्द दावा लावला आहे. मा. अॅड. आदित्य जोशी कायदेशीर सल्लागार हे सर्व केसेस चालवित आहेत. अद्यापि केसेस चालुच आहेत.

६) बालग्राम महाराष्ट्र (ऑर्गनायझेशन) फंडामध्ये आर्थिक परीस्थिती व्यवस्थित नाही. देणग्या मिळविण्यासाठी संस्था पदाधिकारी, कर्मचारी मार्फत प्रयत्न आवश्यक आहे. येरवडा बालग्राम ताब्यात नसल्याने संस्था भेट देणगीदारांना देणे अडचणीचे होत आहे.

७) बालग्राम महाराष्ट्राच्या चार अधिनस्त संस्थांचे online Registration नोंदणी प्रमाण पत्र प्रस्ताव सादर केलेनुसार १) पंचदीप संकुल, नविन पनवेल,२) श्री दिलिप सिंह राजे घाटगे बालग्राम पन्हाळा,जिल्हा कोल्हापुर, ३) बालग्राम महाराष्ट्र संचलित निला बालसदन,अंबरनाथ या तिनही संस्थाना नोंदणी पत्र प्राप्त झाले. बालग्राम येरवडयाची नोंदणी प्रमाण पत्र मान्यता अप्राप्त आहे.

**पंचदीप संकुल, नविन पनवेल** सौ. मिनल टिपणीस स्थानिक समिती अध्यक्षा म्हणुन काम पाहात आहेत. माहे फेब्रुवारी २०१६ पासुन श्री विनायक दिनकर पाटील अधिक्षक, सौ. पुनम पाटील कौन्सिलर सहायक सौ. प्राजक्ता कुरणे वसतिगृह अधिक्षिका/सहायक व श्री विजय गवळी वाहन चालक/सहायक म्हणुन काम पहात आहेत

**डॉ. हरमन मायनर सोशल सेंटर फॉर स्ट्रिट चिल्ड्रेनउ डे केअर सेंटर ,शिवाजीनगर पुणे** हा प्रकल्प राबवण्यात येतो. प्रकल्प संचालक श्रीमती रंजनताई पुराणिक, प्रकल्प समन्वयक श्री शिरीष खामकर, सामाजिक कार्यकर्त्या सौ. अरूणा मिर्वणकर आणि सौ नंदा बिबवे (थोरात) यांनी काम पाहिले. दळवी हॉस्पिटल मध्ये वैद्यकीय अधिकारी मुलांची वैद्यकीय तपासणी व उपचार करतात.

**सुनित विकास केंद्र, निला बालसदन, अंबरनाथ** येथे डॉ. योगेश तुसे स्थानिक समिती अध्यक्ष तसेच सौ. प्रियांका गुजर हया पूर्णवेळ अधिक्षिका,श्रीमती लता मस्के,गृहमाता आणि श्रीमती कोमल परदेशी वॉचमन/सहायक म्हणुन काम पहात आहेत.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

**श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्रामपन्हाळा,कोल्हापूर** चे सौ. सुमित्रा बेनाडीकर स्थानिक समिती अध्यक्षा, श्री संतोष गायकवाड ,अधिक्षक,श्री अमोल दिपक पाटोळे सहायक, श्री कृष्णात माने पाटील अर्धवेळ लेखापाल व सौ. शैला टोपकर,अर्धवेळ समुपदेशक म्हणुन काम पहात आहेत.

**बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज येरवडा,पुणे** मा. प्रधान सचिव महिला बाल विकास,मुंबई यांचे दि. २१-१०-२०१४ च्या आदेशानुसार बालग्रामची मान्यता व प्रमाणपत्र पुर्नस्थापित करून पाच वर्षासाठी प्रशासकास चालविण्यास देण्यात आले आहे. त्यानुसार एस.ओ.एस. इंडिया, नवि दिल्ली बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज येरवडा,पुणे येथे माहे नोव्हेंबर २०१४ पासुन प्रशासक म्हणुन कार्यरत आहे. हा कालावधी माहे नोव्हेंबर २०१९ला संपत आहे.

### १) पंचदीप संकुल, नविन पनवेलः*

या बालसदनाचे व्यवस्थापन बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत केले जाते. बालसदनाची संख्या दोन असुन मंजुर संख्या ३० आहे. अहवालसाली या दोन बालसदनामध्ये ०९ मुले व ०९ मुली असे एकुण १८ मुले आहेत, यापैकी ०४ मुले प्राथमिक, ०७ मुले माध्यमिक ०३ मुले उच्च माध्यमिक, ०३ मुली महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. अहवाल साली संस्थेत ०२ मुली व ०३ मुले नव्याने दाखल झाला आणि ०२ मुले पालकांच्या ताब्यात दिली. तसेच एका मुलीचा विवाह संपन्न झाला.

बालग्राम मध्ये वैद्यकीय सोयी उपलब्ध आहेत. प्रत्येक तीन महिन्यांनी मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यात येते. डॉ. मिलिंद टिपणीस,श्री व सौ. भांडारकर, डॉ. बामणे व डॉ. वीणा पुरोहित हे मुलांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करतात तसेच वैद्यकीय अडचणी सोडविल्या जातात. तसेच आरोग्याची काळजी घेण्यात येते.

मुलांच्या खेळासाठी एक छोटेसे मैदान, घसरगुंडी, कॅरम, क्रिकेट, दोरीवरच्या उडया, बॅटमिंटन, झोके, सी-सॉ, सापशिडी,बुध्दिबळ तसेच इतर बौध्दिक खेळ आहेत. पझल्स,बुध्दिबळ, खाजगी क्लासेसमध्ये कराटे व योगा विनामुल्य शिकतात. करमणुकीसाठी दुरदर्शन संच, स्वतंत्र लायब्ररी, गोष्टीची पुस्तके, वर्तमान पत्रे, मासिके, चित्रकला पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच अनुभव शेअरिंग सेशन ॲक्टिव्हिटि नियमित सुरू आहे.

अहवालसाली मुलांनी शालेय निबंध, वक्तृत्व स्पर्धा,दोरी उडी, संगीत खुर्ची, धावणे जिल्हास्तरीय विविध स्पर्धांमध्ये भाग घेउन बक्षिसे व प्रमाण पत्र मिळवितात.

सौ. मिनल टिपणीस, सौ. पुनम पाटील आणि गृहमाता मुलांचा अभ्यास घेतात व मार्गदर्शन करतात. मुलांचे इंग्रजी व्याकरण करून घेतात. मुलांसाठी वाचनालय उपलब्ध आहे. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम असुन मुले चांगल्या मार्कस्नी पास झाली आहेत.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

तसेच बाल कल्याण समिती रायगड आणि बाल न्याय मंडळ, रायगड यांच्या [illegible] भेटी व्यतिरिक्त खांदेश्वर पोलिस [illegible] श्री [illegible] पाटील, तहसीलदार पनवेल श्री थोरात, बँक ऑफ महाराष्ट्र, नविन पनवेल समस्त [illegible] नगरसेवक अधिकारी/कर्मचारी वर्ग, पत्रकार उत्कर्ष समिती पनवेलचे सर्व पत्रकार अध्यक्ष व सदस्य, रोटरी क्लब ऑफ पनवेल व इनर व्हिल क्लब ऑफ पनवेल यांचे नियमित भेटी व सहकार्य मिळते तसेच अन्य मान्यवर, समाज सेवक, नगरसेवक, देणगीदार, हितचिंतक सभासदांनी अहवालसाली भेट देवुन कामाबद्दल प्रशंसा केली व शुभेच्छा दिल्या.

संस्थेत सर्व धर्मीय,राष्ट्रीय सण जयंत्या,पुण्यतिथ्या,वाढ दिवस साजरे केले जातात २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट या दिवशी शाळा,कॉलेज मध्ये मुले जाउन समारंभ साजरे केले व मुलांनी भाषणात भाग घेतला.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे बालग्राम महाराष्ट्र व सासवड बालग्राम आयोजित बाल आनंद मेळा/हिवाळी मामाच्या गावची सहल माहे नोव्हेंबर २०११ तसेच पन्हाळा येथे ०३ दिवसाच्या सहलीतुन मुलांनी आनंद लुटला. कु. नेहा काची हिने एल.एल.बी. शिक्षण पूर्ण केले. मॅन पॉवर ग्रुप मुंबई कंपनीच्या सी.एस.आर. फंडातुन वीस मुलांचे वार्षिक स्पॉन्सरशिप देणगी म्हणुन प्राप्त झाली. १५० मुलांच्या सहभागातुन स्पर्धा उत्तम पार पडल्या. स्थानिक समिती सदस्य व संस्था पदाधिका-यांनी विशेष मेहनत घेउन कार्यक्रम सफल झाला.

## २) डॉ. हरमन मायनर सोशल सेंटर ,पुणेः*

पुणे येथे पथवासी मुलांसाठी बालग्राम महाराष्ट्रा तर्फे या सोशल सेंटरची स्थापना १४-११-९६ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीच्या दिवशी झाली. मुलांना औपचारिक व अनौपचारिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण या केंद्रामार्फत दिले जात होते. मुलांना स्वाभिमानाने जगता यावे असे प्रयत्न केले जातात. शिक्षणा बरोबर मुलांना स्वच्छता, आरोग्य व लेखन इत्यादिं बाबत शिक्षण दिले जाते. मुलांना जवळच्या शाळेत प्रवेश देउन त्यांचे शिक्षण चालु ठेवण्यात येते. मुलांना खेळाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. मुलांना योग्य व सकस आहार दिला जातो. मुलांचा व्यक्तिमत्व विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. केंद्रामध्ये असणा-या सर्व मुलांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. मुलांच्या आरोग्य/वैद्यकीय सेवेसाठी डॉ. दळवी हॉस्पिटल आणि ससुन रूग्णालयात उपचार घेण्यात येतात.संस्थेतील मुलांची वैद्यकीय तपासणी, रक्त तपासणी, दंत चिकित्सा व डोळे तपासणी करण्यात आली.

या केंद्रामध्ये एकुण ५५ मुले आहेत. त्यापैकी ३३ मुले व २२ मुली आहेत. त्यापैकी १८ मुले प्राथमिक, १८ मुले माध्यमिक, १४ मुले उच्च माध्यमिक आणि ०५ मुले महाविद्यालयीन शिक्षण घेतात. इ. १ली ते इ.१०वी पर्यन्तची मुले भारत इंग्लिश स्कुल येथे शिक्षण घेतात. सोशल वर्कर मुलांना शिकविण्यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडतात. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. महाविद्यालयामध्ये जाणा-या मुलांसाठी बाहेरील शिकवणी वर्ग लावले जातात. मुलांसाठी संगणक प्रशिक्षण दिले जाते.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



केंद्रामध्ये मुलांकरीता विविध उपक्रम राबवुन मुलांचे पुनःर्वसन केले जाते. मुलांना बचतीचे महत्व पटवुन दिल्यामुळे मुले त्यांचे पैसे बँकेत जमा करतात. मुलांना विविध साहित्य उदा. मेणबत्ती बनविणे,ग्रिटिंग कार्ड इ. वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. सेंटरमध्ये संगणक असुन मुलांना प्रशिक्षण दिले जाते. वर्षभरात येणारे सर्व राष्ट्रीय सण,जयंती,पुण्यतिथी साजरे केले जातात. दिवाळीत मुलांना नविन कपडे, फराळाचे देण्यात आले. वस्ती पातळीवरील ध्वजा वंदनामध्ये मुले सहभाग घेतात. केंद्रातील सर्व विद्यार्थी शालेय उपक्रमांमध्ये सहभाग घेतात. बालग्राम महाराष्ट्राच्या सचिव श्रीमती रंजनताई पुराणिक, को-ऑर्डिनेटर यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज चालते. श्री शिरीष खामकर हे प्रकल्प समन्वयक वर्कर, सौ. अरूणा मिर्वणकर व श्रीमती नंदा बिबवे (थोरात) हे सोशल वर्कर म्हणुन काम पहातात. सेंटर मध्ये बैठे खेळ घेतले जातात. त्यामध्ये बुध्दिबळ, कॅरम बोर्ड, लुडो इ. खेळ घेण्यात येतात. करमणुकीसाठी डी.व्ही.डी प्लेयर, टी.व्ही.,इ. साधने आहेत. श्री रजनीकांत नॅन्सी, अध्यक्ष टी.व्ही. चा Set top boxबसवुन दिला सौ. गोखलेताई यांनी टी.वही. दिला आहे. तसेच केंद्रामध्ये गोष्टीची/सामान्य ज्ञानाची पुस्तके आहेत.

भारत इंग्लिश स्कुल मध्ये झालेल्या विविध शैक्षणिक आणि मैदानी स्पर्धांमध्ये दहा विद्यार्थ्यांचा सत्कार करून बक्षिसे देण्यात आली. संस्थेमध्ये कॅरम, रांगोळी मेहंदी इ. स्पर्धांमध्ये सात विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नृत्य, पथनाटय बसविले जातात. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. यु टयुब वरून चित्रकलेचे नमुने

शिकविणे, मेंदी काढण्याचे शिक्षण दिले जाते. मुलांचा शैक्षणिक/मैदानीखेळांच्या उपक्रमात विशेष प्राविण्यासह कामगिरी केली शैक्षणिक प्रगतीसाठी स्वयंसेवक आणि कर्मचारी वर्ग मुलांच्या अभ्यासासाठी सहकार्य करतात. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी श्री जोशी, श्री लकडावाला व कॉग्निझंटचे वॉलेंटियर्स येतात.

सौ. नंदिनी आपटे, श्री शिरिष आपटे, श्री अजित आपटे, सौ. अनुपमा भुतरा आणि Ladies Circle Group, श्री सावंत मॅनेजर, बँक ऑफ बडोदा पुणे यांनी अहवाल साली केंद्राला भेटी दिल्या. तसेच केंद्राचे कार्य पाहुन समाधान व्यक्त केले.

संस्थेला मुलांच्या मैदानी खेळासाठी स्वतःची जागा नाही. मैदानी खेळासाठी शक्ती कॉलेज आणि शेतकी विद्यालयाच्या मैदानात घेतले जातात. स्वतःची जागा (प्लॉट) घेण्यासाठी श्रीमती रंजनताई पुराणिक (सचिव) श्री अशोक घाडगे (कार्यकारी संचालक)हे देणगी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्री शिरिष आपटे यांनी संस्थेला स्वतःची जागा/ फलॅट घेण्यासाठी देणगी स्वरूपात रूपये ७० लाख दिले. आता केंद्राची स्वतःची जागा झाली.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणुन सेंटर मधील मुलांनी पंचदीप संकुल, नविन पनवेल तसचे श्री दिलिप सिंह राजे घाटगे बालग्राम, पन्हाळा जिल्हा कोल्हापूर येथील सांस्कृतिक कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेउन त्यांचा आनंद द्विगुणित झाला

BALGRAM MAHARASHTRA PUNE



३) **बालग्राम महाराष्ट्र संचलित निला बालसदन, अंबरनाथ, जिल्हा ठाणे: ***

हया बालसदनाचे व्यवस्थापन बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र मार्फत केले जाते. एक बालसदन असुन ०८ मुली आहेत. हे बालग्राम फक्त मुलींसाठी चालविले जाते. मुलींची मंजुर संख्या ०९ आहे. अहवालसाली एका मुलीस ठाणे येथे वर्ग केले आणि एक मुलगी नव्याने दाखल झाली. त्यापैकी ०३ प्राथमिक, ०५ माध्यमिक, शिक्षण घेत आहे. अहवालसाली दोन जागा रिक्त आहेत..

मानद डॉ. योगेश ठुसे आणि डॉ. संध्या शिंदे यांचेकडुन मोफत वैद्यकिय उपचार करतात. मुलींची स्त्री रोग तज्ञां मार्फत तपासणी होते. मुलींना आवश्यकतेनुसार औषध व वैद्यकीय सुविधा दिल्या जातात. प्रत्येक तीन महिन्याला उंची-वजन केले जाते. मुलींच्या खेळांसाठी छोटेसे मैदान आहे. फुटबाल, खो-खो,कबड्डी लंगडी खेळ खेळतात. तसेच कॅरम, दोरीच्या उडया, सापशिडी, बुध्दिबळ, बास्केट बॉल,बॅट मिंटन,कोडी पुस्तके इ. खेळ आहेत. तसेच करमणुकीसाठी दुरदर्शन व आकाशवाणी संच, संगणक, टेपरेकॉर्डर ग्रंथालयात गोष्टींची पुस्तके इ. साहित्य उपलब्ध आहे. श्री पराडकर-सौ. अयर संस्कार वर्ग सेवा भावाने घेतात तसेच सौ. चांदेकर आणि दाभाडे मुलांच्या शिकवणी घेतात. दिवाळीच्या सुट्टीत पणती रंगविणे,रांगोळी यांचे प्रशिक्षण दिले जाते. चाचा नेहरू बाल महोत्सवात कु. निकीता हिस कॅरम, कु. दुर्गाला लिंबु चमचा व अपेक्षला चित्रकला स्पर्धेत बक्षिस प्राप्त झाले. कु. रोशनीला गणित व मराठी विषयात प्रथम क्रमांक आला. गोळा फेक स्पर्धेत दुर्गाचा प्रथम क्रमांक आला. मनाचे श्लोक मध्ये अपेक्षाचा प्रथम क्रमांक आला. धावणे स्पर्धेत माणिकचा प्रथम क्रमांक आला.

१ ऑगस्ट २०१८ बालग्राम महाराष्ट्र-निला बालसदन सोशल सेंटर सुरू करण्यात आले. दारिद्रय रेषेखालील (Below Poverty Line) १० मुलींसाठी केंद्रात सोय करण्यात आली. मुली १ली ते ४थी वर्गातील आहेत. स्तुत्य उपक्रम श्री रजनीकांत नेन्सी (अध्यक्ष) व कार्यकारी संचालक, स्थानिक समिती अध्यक्ष, पदाधिकारी यांच्या उपस्थितीत केंद्रास सुरवात झाली.

स्थानिक देणगीदारांचे देणगीतुन बोअरवेल करण्यात आली. पाण्याची टंचाई संपली. श्री विरेंद्र गुजन (संचालक सभासद) यांनी देणगीदार उपलब्ध करून दिला.

लता नेन्सी हॉलचे मागील वर्षी जिर्णोध्दार पूर्ण झाल्याने तो हॉल सांस्कृतिक व इतर कार्यक्रमासाठी वापरास दिला जातो.त्या वापराबाबत देणगी मुल्य स्विकारले जाते थोडक्यात केंद्रास स्वतःचे उत्पन्न चालु आहे. सौ. गुजर हे काम चोख पार पाडतात.

४) **श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्राम पन्हाळा, जिल्हा कोल्हापुर: ***

या बालग्रामचे व्यवस्थापन बालग्राम महाराष्ट्र करते. तीन बालसदने आहेत. हया बालग्रामसाठी मंजुर संख्या ३० आहे. या बालग्राम मध्ये एकुण २३ मुले आहेत. त्यापैकी ०८ मुले प्राथमिक, ०८ मुले माध्यमिक, ०३ मुले उच्च माध्यमिक, तर ०४ मुले व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. १३ मुलांचे पुनर्वसन करण्यात आले. ०९ मुले पालकांच्या ताब्यात देण्यात आली ०२ मुले नोकरी आणि ०२ मुले संस्था बदली निमित्ताने पुनर्वसित झाली.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



वैद्यकिय उपचारासाठी मुलांना शासकीय, ग्रामीण रूग्णालयात, विघ्नहर्ता क्लिनिक येथे डॉ. टोपकर मुलांना वैद्यकीय सेवा मोफत देतात, तसेच जिल्हा रूग्णालय,कोल्हापूर येथे नेले जाते. डॉ. हर्षवर्धन जगताप हे संस्थेला नियमित भेट देतात. प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे. ''संजीवनी'' फौउंडेशन यांचे मॉर्फत औषध पुरवठा केला जातो. संजीवन हॉस्पिटल कोल्हापूर यांचे द्धारे लैंगिक शिक्षण या विषयावर व्याख्यान देण्यात येते.

मुलांसाठी फुटबॉल, व्हॉलीबॉल, खोखो, कबड्डी,क्रिकेट,झोपाळा सारखे खेळ घेण्यात येतात. अंतर्गत खेळांसाठी बुध्दीबळ, कॅरम,दोरीच्या उडया,सापशिडी,लगोरी सारखे खेळ आहेत. दररोज सकाळी व्यायाम, सूर्य-नमस्कार, योगा घेण्यात येतात. सायकल चालविणे पोहण्याचे शिक्षण मुलांना देण्यात येते. संस्थेचे खेळण्यासाठी लहान मैदान आहे. मुले खेळण्याचा आनंद लुटतात. वार्षिक क्रिडा महोत्सव आयोजित करण्यात येतो. तसेच करमणुकीसाठी दुरदर्शन संच व आकाशवाणी संच,डी.व्ही.डी.,ग्रंथालय उपलब्ध आहे. विविध वर्तमान पत्रांचे सामुहिक वाचन करण्यात येते.

बालग्राम महाराष्ट्र व पन्हाळा बालग्राम यांचे सयुक्ताने आणि श्री रजनीकांत नेन्सी (अध्यक्ष) ;यांचे संकल्पनेतुन बालग्राम महाराष्ट्र अधिनस्त संलग्न संस्थातील मुलांच्या सहलीचे नियोजन केले होते. स्थानिक समिती बालग्राम पन्हाळा व संस्था पदाधिका-यांनी खुप मेहनत घेउन सहीलचे आयेजन नियोजनातुन मुलांचे आनंद द्धिगुणित झाला.

वार्षिक परीक्षेत सर्व मुले उत्तीर्ण झाली. मुले व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. इ. १० वीच्या परीक्षेत कु. नरेंद्र निमोरे ८३.८०%, लहु लोहार ७५%,अंकुश लोहार ७३%, अवधुत लोंढे ७३% तर इ. १२वी परीक्षेत ऋषिकेश इनामदार यास विज्ञान विभाग ४५% गुणांनी उत्तीर्ण झाली. हया मुलांना औद्योगिक प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात आला आहे. दर रविवारी दोन तासांचे मुलांचे प्रात्यक्षिकासह व्याख्यान आयोजित करण्यात येते. जीवनाशय बाल युवा केंद्र कोल्हापूर मदतीने दर रविवारी व्यक्तिमत्व विकासावर तसेच समुपदेशन, प्रात्यक्षिक याचा मुलांना लाभ होत आहे. सामुहिक-वैयक्तिक समुपदेशन उपक्रम चालु आहे. श्री योगदा फौउंडेशन कोल्हापूर यांचे मार्फत मेडिटेशन सेशन घेण्यात येते.

मुलांनी वार्षिक क्रिडा महोत्सवात कबड्डी व खो-खो स्पर्धेत व संघाचा दोन्ही क्रिडा प्रकारात दुसरा क्रमांक आला. चाचा नेहरू बाल महोत्सवात विविध स्पर्धा प्रकारात ४ प्रथम, ५ द्धितिय व तृतिय ०१ अशी एकुण दहा बक्षिसे मुलांना मिळाली. मा. जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कोल्हापुर यांनी स्वतंत्र अभिनंदन केले आणि त्यांनी मुलांशी सुसंवाद साधला.

बालग्राममध्ये सर्व धार्मिक, राष्ट्रीय सण, विशेष दिन, थोरांच्या जयंत्या साजरे केले जातात. दिनांक ५-५-२०१७ रोजी डी.वाय.एस.पी. श्री सुरज गुरव साहेब यांनी मुलांचा वाढ दिवस साजरा केला त्यांनी मुलांना शुज भेट दिले.

मा जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, कोल्हापुर, मा. अध्यक्ष/सदस्य साहेबत बाल कल्याण समिती, कोल्हापुर, मा. जिल्हा बाल संरक्षण कक्ष,कोल्हापूर, डी.वाय.एस.पी. श्री सुरज मा. गुरव साहेब, कोल्हापुर मा. न्यायाधिश, जिल्हा सत्र न्यायालय, कोल्हापुर, पन्हाळा पोलिस ठाण्याचे उपाधिक्षक श्री शशिकांत गिरी, श्री नामदेव गणपतराव शिंदे पोलिस निरिक्षक हुपरी, ए.पी.आय. कोल्हापुर श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील आणि सौ. संगिता म्हतुकडे जायंटस ग्रुप अध्यक्ष, जीएसटी अधिकारी श्री सागर चतुर , पन्हाळा तहसीलदार श्री रामचंद्र चौबे यांनी तसेच अनेक मान्यवरांनी संस्थेस भेट देवुन मुलांना भेट वस्तु दिल्या मुलांशी संवाद साधला सर्व मान्यवरांनी कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अहवालसाली माहे जुलै २०१७ मध्ये रूद्रांश कला संस्था कोल्हापुर यांच्या वतीने बाल कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल ''वात्सल्यसिंधु आई'' पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. तसेच शासन निर्देशानुसार सर्व विद्यार्थ्यांचे केअर प्लॅन तयार करून संबंधीत कार्यालयांना पाठविण्यात आल्या. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबासाहेब जाधव यांची १०१ वी जयंती दिनांक १७-६-२०१६ रोजी उत्साहात साजरा करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणुन पोलिस उपनिरिक्षक श्री शशिकांत गिरी आणि संस्था संचालक श्री अनंत हावळ, सौ. तेजस्विनी गुरव व संस्था कर्मचारी उपास्थित होते. कार्यक्रमात मुलांना खाउ वाटप करण्यात आला.

**५) कस्तुरबा बालसदन, सासवड, ता. पुरंदर, जिल्हा पुणे:**

या बालग्रामचे व्यवस्थापन कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट यांचेकडे आहे. या बालग्राममध्ये तीन बालसदने आहेत. या बालग्राममध्ये फक्त मुलींनाच प्रवेश दिला जातो. मुलींची मंजुर संख्या २७ आहे. प्रत्यक्ष पटावर ०४ मुली आहेत. बालग्राम मधील मुलीं सरकारी ग्रामीण रूग्णालय, चिंतामणी हॉस्पिटल आणि डॉ. भरत तांबे यांच्या क्लिनिकमध्ये उपचारासाठी नेले जाते किंवा खाजगी डॉक्टरांकडुन वैद्यकीय सेवा घेतात. तीन महिन्यातुन मुलींची संस्थेमध्ये पूर्ण आरोग्य तपासणी केली जाते. मुलींना खेळण्याकरिता मैदान आहे.
तसेच कॅरम बोर्ड,दोरी उडया,लगोरी बॅट मिंटन, सापशिडी इ. खेळणी आहेत. मुली खोखो,लंगडी यासारखे पारंपारिक खेळ सुध्दा खेळतात.दुरदर्शन संच,टेपरेकॉर्डर, डीव्हीडी प्लेयर आणि अवांतर पुस्तके ही करमणुकीची साधने आहेत. संस्थेत सर्व प्रकारचे शिक्षक असुन शिकवणी घेतली जाते संस्कार व छंद वर्ग आहेत. बाल वाचनालय आहे. कु. वैशाली सातपुते पुणे विभागात कब्बड्डी स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात द्वितिय, तालुका व शलेय स्पर्धेतम विशेष प्राविण्य. कु. ज्योती डिघळे आंतर शालेय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत तृतिय क्रमांक प्राप्त.

संस्थेमध्ये विविध सण,राष्ट्रीय दिन,कस्तुरबा मातृदिन,गांधी जयंती तसेच इतर थोरांच्या जयंत्या साज-या केल्या जातात. मा. सुरोज डामोर (मंत्रीजी कस्तुरबा ट्रस्ट) इंदौर तसेच अध्यक्ष बाल कल्याण समिती पुणे मान्यवरांनी भेट देउन समाधान व्यक्त केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**६) कस्तुरबा बालसदन, धारणी जिल्हा अमरावती:**

या बालग्रामचे व्यवस्थापन कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट यांचेकडे आहे. या बालग्राममध्ये एक बालसदन आहे. या बालग्राममध्ये फक्त मुलींनाच प्रवेश दिला जातो. मुलींची मंजुर संख्या २० आहे. प्रत्यक्ष पटावर ०६ मुली आहेत. बालग्राम मधील मुली ग्रामीण रूग्णालय किंवा खाजगी डॉक्टरांकडुन वैद्यकीय सेवा घेतात. मुलींना खेळण्याकरिता मैदान आहे. तसेच कॅरम बोर्ड,दोरी उडया,लगोरी,सीसॉ,झोका, सापशिडी, रिंग, व्हॉलिबॉल इ. खेळणी आहेत. मुली खोखो,लंगडी यासारखे पारंपारिक खेळ सुध्दा खेळतात.

रोज सकाळी योगासने करून घेतली जातात. दुरदर्शन संच,टेपरेकॉर्डर, डीव्हीडी, संगणक अवांतर वाचन पुस्तके ही करमणुकीची साधने आहेत. संस्थेत सर्व प्रकारचे शिक्षक असुन शिकवणी घेतली जाते. संगणकावर अभ्यास घेतला जातो. स्पिकवेल इंग्रजी व विज्ञान प्रयोगही घेतले जातात. संगीत,शारिरीक शिक्षण,ज्युडो-कराटे शिकविले जातात. संस्कार व छंद वर्ग आहेत. बाल वाचनालय आहे. अमरावती येथील जिल्हास्तरिय स्पर्धेत कु. राजेश्वरील बडदे हिस लिंबु-चमचा व गायन स्पर्धेत बक्षिस मिळाले.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

संस्थेमध्ये विविध सण,राष्ट्रीय दिन,कस्तुरबा मातृदिन,गांधी जयंती तसेच इतर थोरांच्या जयंत्या साज-या केल्या जातात. सत्यवान मॅडम, अमरावती कोर्टचे न्यायाधिश , जि.म.बा कार्यालयाच्या पर्यवेक्षिका बाल कल्याण समितीचे पदाधिकारी यांनी संस्थेस भेट दिली तसेच अनेक मान्यवरांनी भेट देवुन समाधान व्यक्त केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विविध नेत्यांचे जीवन चरित्र मुलींना समजावे म्हणुन दर रविवारी बालसभा घेतली जाते, त्यामुळे मुलींसमोर एक आदर्श निर्माण केला जातो.

**७) आनंद बालग्राम, शारदानगर, सगरोळी, जिल्हा नांदेडः**

हे बालग्राम 'संस्कृति संवर्धन मंडळ,' शारदानगर, सगरोळी ही संस्था चालवित आहे. एकुण १२ पैकी तीन सदने केवळ मुलींसाठी चालविण्यात येतात. मुलींची मंजुर संख्या १०८ आहे. सध्या बालग्राममध्ये ७५ मुली आहेत. मुलांच्या अभ्यासाकरिता कौन्सिलरची नेमणुक तसेच पर्यवेक्षीय व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी व संध्याकाळी ७ ते ९ या वेळात मुलांकडुन अभ्यास करून घेतला जातो. इ. १०वी आणि १२वी मधील मुलांसाठी उन्हाळी अभ्यास वर्ग घेतले जातात. अभ्यासाकरिता स्वतंत्र इमारत आहे. मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी शालेय शिक्षणा बरोबर अंतर्गत व मैदानी खेळांचे साहित्य व मार्गदर्शक उपलब्ध करून दिले आहेत. उदा. फुट बॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कॅरम,थाळी फेक,गोळा फेक इ. साहित्य उपलब्ध आहे. खेळण्यास प्रशस्त मैदाने आहेत. करमणुकीसाठी दुरदर्शन व आकाशवाणी संच आहेत. मुलांना वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुलींच्या आरोग्य संदर्भात डॉक्टर संस्थेतुन येउन मुलींच्या आरोग्याची तपासणी महिन्यातुन दोनदा करतात, तसेच संस्थेचे 'संजीवनी आरोग्य मंदीर' हे सुसज्ज रूग्णालय आहे. धार्मीक व राष्ट्रीय सण, थोर नेत्याच्या जयंत्या, विशेष दिन साजरे केले जातात.

अहवालसाली अनेक मान्यवरांनी संस्थेला भेट देउन कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अहवालसाली दिनांक १८-३-२०१८ रोजी संस्थेत साडी चोळी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मान्यवर उपस्थित श्री चित्राद्धार सर व श्री सुनंदा देशमुख उपस्थित होत्या. नव वर्षाच्या निमित्ताने मेस विभागात काम करणा.या सर्व महिलांना छोटीशी भेट म्हणुन साडी चोळी देण्यात आली. तसेच दिनांक २३-३-२०१८ रोजी वसुंधरा सभागृहामध्ये श्री सुनिल देशमुख, श्री संजय सगरोळीकर तसेच माजी सैनिक कपांडर श्री महातो सर, श्री केळकर सर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

तसेच इतर सर्व धर्मीय,राष्ट्रीय सण, विशेष दिन, थोर नेत्यांच्या जयंत्या,पुण्यतिथ्या साजरे केले जातात. अहवालसाली संस्थेस मा. श्रीमती संगितताई धायगुळे,आयुक्त महानगरपालिका, श्री अजयजी मोरे, प्रांताधिकारी, मालेगांव, श्री हर्ष पोतदार, अप्पर पोलिस अधिक्षक, श्री श्रीनिवास कलत्री, उद्योजक, मालेगांव तसेच अनेक मान्यवरांनी संस्थेस भेट देउन चाललेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



विशेष उल्लेखनीय बाबीचा उल्लेख करावयाचा झाल्यास मुलांसाठी वाचनालय सुरू करण्यात आले असुन लहान-मोठी ४००० पुस्तके असुन मुलांना संगणक चालविण्याचे शिक्षण दिले जाते.

सन २०१८-१९ साली विश्वस्त मंडळाच्या ०४ आणि ०१ विशेष बैठक अशा एकुण ०५ आणि ,संचालक मंडळाच्या ०४ तसेच  वार्षिक सर्वसाधारण सभेची ०१ बैठक घेण्यात आल्या.

| | विश्वस्त | संचालक | वार्षिक सर्वसाधारण सभा |
|---|---|---|---|
| १) | दि. १५-०७-२०१८ | दि. १५-०७-२०१८ | दि. १५-०७-२०१८ |
| २) | दि. ०७-१०-२०१८ | दि. ०७-१०-२०१८ | |
| ३) | दि. १२-०१-२०१९ | दि. १२-०१-२०१९ | |
| ४) | दि. ०२-०४-२०१९ | दि. ०२-०४-२०१९ | |

**********************